PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Foreignchi Patlin
Year: 2009

Song: Zunjumunjula deto haka
Lyricist:

झुंजुमुंजुला देतो हाका वासुदेव भोळा
नाचत म्हनतो ऐका ऐका वासुदेव भोळा
टोप शिरावर मोर पिसांचा वासुदेव भोळा
कधीच न्हाई झोपत त्याच्या पंखामधला डोळा
पंखात पाखरांच्या गोड वाजतात टाळ
पंखात पाखरांच्या गोड वाजतात टाळ
झाली आनंदाची छान सुखाची सकाळ
झाली आनंदाची छान सुखाची सकाळ
हुंदडती हंबरती नादामंदी गुरंढोरं
वाजती कानात गळयातली घुंगरमाळ
लगबग लगबग बाया जाती नदी काठी
लगबग लगबग बाया जाती नदी काठी
घडी डोईवर आणि बाळ बांधूनिया पाठी
येई हासत हासत प्राचीवर सूर्यबाळ
येई हासत हासत प्राचीवर सूर्यबाळ
झाली आनंदाची छान सुखाची सकाळ

झाली आनंदाची छान सुखाची सकाळ
हिल हिल हिलोरी
हिल हिल हिलोरी
हिल हिल हिलोरी हो...
हिल हिल हिलोरी
हिल हिल हिलोरी
हिल हिल हिलोरी हो...
अंगणात उमलती रंग फुले रांगोळीत
दारादारावर झुले पानफुलातली माळ
हरिनामाच्या भक्तीचे गाव भजन म्हणती
माथ्यावर वैष्णवांच्या गंध मुद्रा ही खुलती
येई हासत हासत प्राचीवर सूर्यबाळ
येई हासत हासत प्राचीवर सूर्यबाळ
झाली आनंदाची छान सुखाची सकाळ
झाली आनंदाची छान सुखाची सकाळ

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*